## नियमित दिवाणी दावा क्र.५०७/२०१८ मधील
## निशाणी क्र.२७ वर आदेश

०१. सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.३ याने त्याच्या विरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रदद करण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रस्तूत प्रकरणात प्रतिवादी क्र.३ याने कोव्हीड–१९ च्या प्रादुर्भावामुळे त्याची कैफियत दाखल करु शकलेला नाही. त्यामुळे त्याच्या विरुध्द झालेला विना कैफियतीचा आदेश रदद करुन देण्यात यावा यासाठी प्रस्तूतचा अर्ज दाखल केलेला आहे.

०२. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे.

०३. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन स्पष्ट होते की, सदर प्रतिवादी क्र.३ याने मुदतीत न्यायालयात हजर राहून त्याची कैफियत दाखल करु शकलेला नाही. त्यामुळे त्याच्या विरुध्द विना कैफियतचा आदेश पारित झालेला आहे. उभय पक्षकारांतीत वाद मिटविण्यासाठी तसेच प्रतिवादी क्र.३ यास त्याची कैफियत देणे नैसर्गिक आहे. त्यामुळे अर्जात नमूद कारण, पक्षकारांमधील वादाचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

### आ दे श

नि.क्र.२७ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो व प्रतिवादी क्र.३ याच्या विरुध्द झालेला विना कैफियतचा आदेश रदद करण्यात येतो.

Digitally signed by KALIDAS SIDRAM SURYAWANSHI
Date: 2022.04.27 16:56:06 +0530

(के. एस. सुर्यवंशी)

दि.२७.०४.२०२२ दिवाणी न्यायाधीश व. स्तर निलंगा.